International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व युवक

**डॉ. साहेबराव एस.पवार**
*यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर जि.वाशीम*
*Corresponding Author – डॉ.साहेबराव एस.पवार*
**DOI - 10.5281/zenodo.15245253**

महाराष्ट्राचा भूमीत अनेक संत जन्माला आलेत. त्या संतानी समाज सुधारणा करण्याचे मोलाचे कार्य केले. अंधश्रद्धा निर्मुलन, राष्ट्रप्रेम, सामाजिक एकतेसाठी त्यांनी कीर्तन, भजन, भारुड, प्रवचन इत्यादीद्वारे जनजागृतीचे कार्य केले. अशा अनेक संता मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होते. त्यांनी आपल्या भजनातून व कीर्तनातून अंधश्रद्धा निर्मुलन, जातिभेद निर्मुलन करण्याचे कार्य केले. ग्रामगीता ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी तरुणाना ग्रामस्वच्छेतेचे महत्व सांगितले. तरुणांनी देश स्वरक्षणासाठी तत्पर असले पाहिजे असा विशेष संदेश दिला. अशा या महान संताचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी विदर्भातील अमरावती जिल्हात यावली येथे झाला. त्यांच्या वडिलाचे नाव बंडोजी, तर आईचे नाव मंजुळाबाई होते. त्यांचे घराणे पंढरीचे वारकरी होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे मूळ नाव माणिक बंडोजी इंगळे होते. त्यांनी खंजेरी भजन पद्धतीने समाज प्रबाधांचे कार्य केले. त्यांच्या कीर्तनातून तसेच लिखाणांतून देशप्रेम, देशसेवा तारुण्याच्या मनात निर्माण करण्याचे महान कार्य केले.

## युवक व ग्राम:

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजानी सर्व देशातील युवकांना त्यांच्या साहित्यातून एक दैदीप्यमान संदेश दिला आहे. युवकांनी बलवान व्हावे, नितिमान व बुद्धीमान व्हावे. तसेच तरुणाने आपले जीवन देशसेवेकरिता द्यावे असा सल्ला दिला. संत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेतून तरुणांना एक प्रखर क्रांतिकारक संदेश दिला आहे. तरुणांनी आपल्या गावाला समृद्ध करण्यासाठी झटावे. नव्हे तर ते त्यांचे कर्तव्य आहे असे सांगितले. आपल्या गावाच्या विकासासाठी वेळ खर्ची घालावा. महाराज लिहितात

**उच्च शिक्षण । हे तर गेले मागील युगी लापोन।**
**आता व्हावा कष्टीक बलवान। सुपुत्र भारताचा।।**

युवकांनी स्वत:चा विकास स्वताचा साधावा. त्यानंतर त्यांनी गावं व देश सेवेकरिता पुढे यावे. "जगात तुम्हाला दिसणारा बदल व्हा. स्वतःपासून सुरुवात करा आणि नंतर इतरांना प्रकाश द्या." यावरून महाराजांना तरुण वर्गाकडून किती अपेक्षा होती हे समजते. ते पुढे म्हणतात.

**गावा गावाशी जागवा। भेदभाव हा समूळ मिटवा।।**
**उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। दास तुकड्या म्हणे।।**

थोडक्यात गावात जागृती करा, गावागावातील जातीत तेड मिटवून एकता निर्माण करण्याचे कार्य तरुणांनी आपल्या हाती घ्यावा असा उपदेश ते करीत असत. आणि त्यातून गावाचा विकास करा. ग्रामउन्नती हाच तरुणाचा ध्यास असला पाहिजे असे तुकडोजीना अपेक्षित होते.

## युवक व शिक्षण :

राष्ट्रसंतांनी आपल्या तरुणाने बालवयात शिक्षण घावे पण सोबत व्यायाम करून शरीर कमवावे. महाराजांना अपेक्षित शिक्षण हे होते कि "शिक्षण हे

फक्त पुस्तके आणि पदव्यांबद्दल नाही; ते चारित्र्य, मूल्ये आणि ज्ञानाबद्दल आहे." असा मौलिक संदेश महाराज देत असत. कारण बलवान तरुणच देश सेवेचे कार्य करू शकेल. आई, वडलांची सेवा करावी सोबतच गुरूचा आदर करावा. युवकांनी ग्रामसेवा, समाजसेवा, देशसेवा याना आपल्या जीवनाचे ध्येय मानावे. बाल वयापासूनच मुलांना योग्य शिक्षण व संस्कार जर दिले तर त्यांच्या मधूनच उद्याच्या संपन्न भारताची पिढी निर्माण होईल. आणि हि नवीन पिढी नवराष्ट्र निर्माण करू शकतील. आणि म्हणूनच महाराज म्हणतात,

**या कोवळ्या कळ्यामाजी। लपले ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी॥**
**विकसता प्रगटतील। शेकडो महापुरुष समाजी॥**

या युवकांना महान कार्य करण्याऱ्या थोर पुरुषाचे म्हणजे शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर, रवींद्रनाथ टागोर इत्यादीचे कार्य सांगितले तर त्यांच्यात नवचैतन्य निर्माण होईल व ते जागृत होतील. त्यासाठी ते भजनातून व कीर्तनातून त्यांच्या कार्याचे दाखले देत असत आणि युवकांना आवाहन करीत,

"उठा, जागे व्हा आणि महानतेची आकांक्षा बाळगा. तुम्ही आमच्या राष्ट्राचे भविष्य आहात." असा संदेश महाराज देतात. महान पुरुषांचे दाखले देऊन तरुणाना प्रोत्साहन देणाचे मोलाचे कार्य राष्ट्र संताने केले. संत तुकडोजी महाराजाची अशी शिकवण युवकांना आपले ध्येय साध्यकरण्यासाठी मोलाची ठरली.

**युवक व देश :**

युवकच भारताचे भावी आधार स्तंभ असतात असे तुकडोजी महाराजाचे विचार होते. भारत हा शेतकराचा देश आहे. म्हणजेच कृषिप्रधान देश आहे. काबाड कष्ट करून भारतीय जनता जीवन जगत असते. अशा कष्टकरी जनतेच्या सेवेकरिता भारताच्या सुपुत्राने पुढे यावे. राष्ट्र संत तुकडोजी म्हणतात देश हा देव आहे असे समजून त्यासाठी त्याग करायची तयरी ठेवा.

**कष्ट करोनि महाल बांधसी। परी झोपडीही नसे नेटकीशी।**
**स्वातंत्र्या करिता उडी घेशी। परी मजा भोगती इतरची॥**

राष्ट्रसंतांची ग्रामगीता ही प्रत्येक युवकांसाठी एक आदर्श जीवन प्रणाली आहे. त्यात तरुणाची कर्तव्य, त्यांनी जीवन जगनाची पद्धत तसेच राष्ट्र हितासाठी बजावयाची जबाबदारी सांगितली आहेत. महाराज म्हणतात जर तरुणाने ग्रामगीता या ग्रंथाच्या मार्गदर्शनानुसार आचरण केले तर प्रत्येक युवक आपल्या जीवनाचा, गावाचा व देशाचा शिल्पकार होऊ शकतो. तुकडोजीने भारतिय तरुणात राष्ट्र प्रेम निर्माण करून तरुणांना क्रांतीकारी आवाहन केले होते. तुकडोजी महाराज तरुणांना राष्ट्रीय अभिमान, देशभक्ती आणि त्यांच्या देशाप्रती जबाबदारीची भावना विकसित करण्याचे आव्हान देत असत. तरुणांनी बळ, शौर्य, धैर्य या मूल्यांना आपल्या जीवनाचा मुख्य आधार मानावे व देशहितासाठी तत्पर राहावे असा संदेश देत म्हणतात,

**झाड झडूले शस्त्र बनेगे । भक्त बनेगी सेना |**
**पत्थर सारे बॉम्ब बनेगे। नाव लगेगी किनारे॥**

आशा प्रकारे देशप्रेम निर्माण करणारे विचार मांडून महाराजांनी तरुणामध्ये नवचैतन्य निर्माण केले. दगड सुधा बॉम्ब बनू शकतो जर तरुण देशहितासाठी तयार असेल तर. देशातील प्रत्येक चेतन व अचेतन वस्तूला स्वातंत्र्य लढ्यात योगदान देण्यासाठी तुकाडोजीनी आवाहन केले होते. युवक भारताच्या भविष्याला आकार देण्यासाठी सक्षम आहेत पण त्यांसाठी युवकांनी आपल्या सामथ्यार्चा उपयोग करावा. "युवा हा आपल्या राष्ट्राचा कणा आहे. चांगले भविष्य घडविण्यासाठी तुमची ऊर्जा, उत्साह आणि आदर्शवाद वापरा." असा उपदेश त्यांनी तरुणाला दिला. देशसेवा हा सर्वात मोठा धर्म युवकांचा आहे तो त्यांनी प्राणपणाने जपावा व भारताला समथ्यशाली बनवावे असे आवाहन राष्ट्रसंत करतात.

**युवक व व्यवसाय :**

युवकांनी जीवन जगतांना एक तरी कला गुण अंगी बाणवून आपले जीवन स्वाभिमानाने जगावे यासाठी युवकांनी फक्त शिक्षण घेऊन उपयोग नाही तर विहिरी, नदी, तलाव यामध्ये पोहणे ही कला अवगत करावी. स्वचरिताथार्साठी कोणत्याही व्यवसाय करावा. महाराज म्हणतात नोकरीला लहान व मोठा न मानता तो व्यवसाय नोकरी निष्ठेने करावा. मानवी जीवन सुखमय आहे. जीवन आनंदाने जगता येण्यासाठी एक तरी कला युवकांच्या अंगी असावी असे आवाहन संत तुकडोजी करतात.

**मुलात एक तरी असावा गुण। ज्यामुळे त्यात पोट भरेल निपुण।।**

युवकांनी देश भावनेला देव भावना मानण्याची गरज आज निर्माण झाली आहे. युवकांनी फक्त स्वत:पुरतेच जीवन न जगता स्वत:चे जीवन हे राष्ट्रभावनेतून जगावे. राष्ट्रसंतांची लहर की बरखा, आदेश रचना यातील पद रचना ही जनजागृतीसाठी खूप प्रभावी आहेत. महाराजांचे विचार युवकांना जीवन जगण्यासाठी प्रेरणादायी आहेत.

**जीवनाच्या गरजा संपूर्ण। निवार्हाचे एक साधन |**
**याचा असावा अंतर्भाव। एक तो शिक्षणी।।**

स्वत:च्या जीवनाला आकार देण्यासाठी आपल्या शक्तीस्थळांना ओळखून त्यांना विकसित करावे व आपल्या मयार्दा, उणीवा याना कमी करून जीवनात प्रगती करावी. असे आवाहन त्यांनी केले आहे. युवकांसाठी राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेमध्ये एक आदर्श आचारसंहिताच सांगितली आहे. ज्याद्वारे प्रत्येक युवक आपल्या आयुष्याची उद्दिष्टे प्राप्त करून आपले आत्मकल्याण साधू शकतो. थोडक्यात राष्ट्र संतानी युवकांकडून अनेक अपेक्षा ठेवून त्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

**सारांश:**

संत तुकडोजी महाराज हे ७७ वर्ष जगलेत. ते जनतेच्या, विशेषतः तरुणांच्या उन्नतीचे एक प्रखर पुरस्कर्ते होते. आयुष्यभर महाराजांनी जनजागृती, अंधश्रद्धा निर्मुलन, सामाजिक एकता देशसेवा याविषयी समाजात जागृती करण्याचे महान कार्य केले. तरुणांना त्यांनी दिलेल्या आव्हानाचे संभाव्य स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१. तुकडोजी महाराज यांनी तरुणांना त्यांची खरी क्षमता, मूल्ये आणि आवडी शोधण्याचे आव्हान केले. ते त्यांना आत्मपरीक्षण, चिंतन आणि त्यांच्या अंतरंगाचा शोध घेण्यास प्रोत्साहित करतील.

२. प्रामाणिकपणा, सचोटी, करुणा आणि आत्म-शिस्तीच्या पायावर बांधलेले एक मजबूत नैतिक चारित्र्य तरुणाने विकसित करावे अशी त्याची इच्छा होती.

३. तुकडोजी महाराजानी तरुणांना त्यांच्या कृतींची आणि समाजावर होणाऱ्या परिणामाची जबाबदारी घेण्याचे आव्हान केले. ते त्यांना सामुदायिक सेवा, स्वयंसेवा आणि सामाजिक कार्यात सहभागी होण्यास प्रोत्साहित करीत.

४. ते केवळ शैक्षणिकच नव्हे तर भावनिक, आध्यात्मिक आणि शारीरिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करायचे. ते तरुणांना आयुष्यभर शिक्षण, आत्म-सुधारणा आणि वैयक्तिक विकास साधण्याचे आव्हान देत.

५. विशेष म्हणजे तरुणाने देश रक्षणासाठी सदैव तयार असावे. त्यासाठी शारीरिक शक्ती असणे गरजेचे आहे याविषयी वेळोवेळी कीर्तनातून व भजनातून मार्गदर्शन करीत असत.

**संदर्भ ग्रंथ :**


१. ग्रामगीता .. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ..गावंडे प्र.ल.
३. https://mr.wikipidia.org